## निशाणी २६ व २८ खालील आदेश

१. वादीने सदरचे अर्ज प्रतिवादी क्र.४ च्या वारसांना अभिलेखावर प्रतिवादी पणात सामील करण्याबाबत झालेला विलंब माफ होवून मिळावा व मयत प्रतिवादी क्र.४ यांचे वारस दाव्यात सामील करणेकामी केला आहे.

२. वादीतर्फे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा जाहिर ठराव, निरंतर मनाई हुकूम यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.४ भानुदास गेणू साळवे हे दि.१३.०५.२०२३ रोजी मयत झाले. याबाबत प्रतिवादीने दिनांक २१.०७.२०२३ रोजी पुसरीस दिल्यानंतर वादींना माहिती झाली. त्यानंतर वारसांना दाव्यात सामिल करण्यास ७ दिवसांचा विलंब झालेला आहे. मयत प्रतिवादी क्र.४ यांच्या वारसांना दाव्यात सामिल करणे गरजेचे आहे. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जास हरकत घेतली की, अर्ज कायदेशीर नाही व त्यास संयुक्तीक कारण नाही.

४. युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी दिनांक २१.०७.२०२३ रोजी निशाणी क्र. २५ वर प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक १३.०५.२०२३ रोजी मयत झाल्याबाबत पुरसीस दिलेली आहे. त्यानंतर वादीने प्रस्तुत अर्ज दिनांक १८.०८.२०२३ रोजी दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत दावा हा प्रतिवादी क्र. ४ याने केलेल्या खरेदीखतासंदर्भात आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ च्या वारसांना दाव्यात सामिल करणे आवश्यक आहे. वादीस वारसांना सामिल करण्यास केवळ सात दिवसांचा उशिर झालेला आहे. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करून खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

(१) निशाणी २६ व २८ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) मयत प्रतिवादी क्र.४ याचे वारसांना दाव्यात सामील करण्यास झालेला ७ दिवसांचा विलंब रक्कम रु.२००/– एवढा दंड आकारुन माफ करण्यात येतो.

(३) सदर दंडाची रक्कम वादीने प्रतिवादींना द्यावी.

(४) दंडाची रक्कम भरल्यानंतर नि.२६ मध्ये नमुद केलेल्या वारसांना अभिलेखावर प्रतिवादीपणात सामील करण्यात यावे.

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.06.25 17:44:32 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

(**संध्या यु. सुळ**)

दिनांक–२५/०६/२०२५.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नेवासा, जि. अहमदनगर.